25 वर्षे
विकासाची

"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

जा.क्र.मनपा/पा.पु.व मलनि/जन/ ५५ /२०२६-२७ दि.०७/०४/२०२६

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
जनसंपर्क विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

विषय :- प्रेस नोट प्रसिध्द करणेबाबत...

महोदय,

सोबत जोडलेली पाणीपट्टी वसुली संबंधि प्रेस नोट महानगपालिकेच्या वेबसाईटरवर प्रसिद्ध करावी.

(दिपक खाबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानरगपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग

### // प्रसिद्धी पत्रक //

मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामार्फत प्रती वर्षी पाणीपट्टी वसुलीकरीता विषेश मोहिम राबविण्यात येते. सन 2025-26 वर्षात देखिल मा.आयुक्त महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. शहर अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्या नियंत्रणाखाली सदर मोहिमेअंतर्गत विभागातील उप-अभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, लिपिक, मेस्त्री, मिटर रिडर व वितरण व्यवस्थेतील इतर कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली होती. सदर पथक थकबाकीदारकांची यादी तयार करुन प्रत्यक्ष थकबाकीधारकांना भेटी देणे, थकबाकीधारकांना नोटीस बजावणे, थकीत रक्कमेचा भरणा करणेकरीता प्रवृत्त करणे, चेक रिर्टन वसुली करणे व थकबाकीधारकांच्या नळजोडण्या खंडीत करणे इ. प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

नागरीकांमध्ये पाणीपट्टी भरणा जलद होणेसाठी जनजागृती करणेकरीता ऑटोरिक्षा यांचेवर ध्वनिक्षेपकाव्दारे जाहिर सुचना प्रसिद्ध करण्यात येतात. तसेच प्रत्यक्ष पाणीपट्टी थकबाकीधारकांच्या घरोघरी भेट देऊन थकीत पाणीपट्टी रक्केमेचा भरणा करणेकरीता प्रवृत्त करण्यात आलेले आहे. महानगरपालिकेमार्फत नागरीकांना पाणीपट्टी भरणे सोयीचे होणेकरीता महानगरपालिकापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन तसेच मोबाईलव्दारे देखिल MY MBMC या मोबाईल ॲपव्दारे तसेच POS मशीनव्दारे पाणीपट्टी भरण्याची सुविधा दिलेली आहे. विभागामार्फत पाणीपट्टी रक्कमेचा Online भरणा होणेकरीता विषेश प्रयत्न केले आहेत. त्यामुळे धनादेश न वटता परत येण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. तसेच सर्व सार्वजनिक सुट्टी, शनिवार तसेच रविवार या दिवशी सर्व पाणीपट्टी भरणा केंद्र सकाळी 9.45 ते सायंकाळी 6.15 पर्यंत सुरु ठेवण्यात आलेली होती. तसेच पाणी पुरवठा विभागातील सर्व कर्मचारी वर्ग यांनी सर्व सुट्टीच्या दिवशी देखिल पाणीपट्टी वसुली करीता प्रयत्न केले आहेत. विभागाने विषेश मोहिमेअंतर्गत केलेल्या कारवाईत महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपट्टी थकबाकीधारकांच्या एकूण 95 नळजोडण्या खंडीत केलेल्या आहेत. विभागाने अस्तित्वात नसलेल्या मालमत्तांच्या थकीत पाणीपट्टी निर्लेखित करावयाचा रु.61.17 लक्ष रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यास वसुलीच्या टक्केवारीमध्ये वाढ होण्यास मदत होईल.

मार्च 2026 या महीन्यात मा. महापौर व मा. आयुक्त यांनी पाणीपट्टी वसुलीबाबत आढावा घेऊन जास्तीत जास्त वसुली करण्याबाबत विभागास निर्देश दिले त्यानुसार पाणी पुरवठा व मलनिसारण विभागाने 31 मार्च 2026 अखेर एकूण 109.90 कोटी पाणीपट्टी वसुली करण्यात आलेली आहे. म्हणजेच एकूण वसुली 96.80% व त्यापैकी चालु वर्षाची 98.79% इतकी पाणीपट्टी वसुली केली आहे.

मागील तीन वर्षातील मागणी व वसुलीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | मागणी (कोटी) | | वसुली (कोटी) | | टक्केवारी (%) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मागील | चालु | मागील | चालु | एकुण | चालु |
| 2023-24 | 4.03 | 84.20 | 1.46 | 82.20 | 94.82 | 97.63 |
| 2024-25 | 4.57 | 106.97 | 2.37 | 105.41 | 96.63 | 98.55 |
| 2025-26 | 3.79 | 109.74 | 1.49 | 108.41 | 96.80 | 98.79 |







(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका